# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २०६ /२०२०**

**तक्रारकर्ता - श्रीमती जेनिफर रेबेलो**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र) प.उप-१,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता इमारत प्रस्ताव (प.उप)-१ यांचे कार्यालय,
हिंदुसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे मंडई ऑफ जेव्हीएल आर. पुनमनगर,
जोगेश्वरी (पूर्व) मुंबई-४०० ०९३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र) प.उप-१,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता इमारत प्रस्ताव (प.उप)-१ यांचे कार्यालय, हिंदुसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे मंडई ऑफ जेव्हीएल आर. पुनमनगर, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई-४०० ०९३.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.११.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित (Video Conference द्वारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु. मा. आ. नों. क्र. ४००२/२०१८ रा. मा. आ. अपील क्र. १५७७/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ११.०३.२०२० रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेले द्वितीय अपील अर्ज कलम १८ अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरित करण्यात येत आहे."*

२. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ. प्र.) प. उप -१ बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता इमारत प्रस्ताव (प.उप-१) यांचे कार्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई ४०० ०९३ यांच्याकडून दि. २४.०९.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला होता. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ. प्र.) प. उप -१ बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता इमारत प्रस्ताव (प.उप-१) यांचे कार्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई ४०० ०९३ यांनी दि.१४.०८.२०२० रोजी आयोगास अहवाल सादर केला.

३. तक्रारकर्ता यांनी द्वितीय अपीलाची सुनावणी Video Conference द्वारे घेण्याची आयोगास विनंती केली. तक्रारकर्ता यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी Video Conference उपस्थित असून जन माहिती अधिकारी प्रत्यक्ष द्वारे उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, तक्रारकर्ता यांना हव्या असलेल्या माहितीचे पुन्हा निरीक्षण देण्याची तयारी दर्शविली.

४. तक्रारकर्ता यांनी दि. ०८.१२.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन संबधित नस्तीचे निरीक्षण करावे आणि हव्या असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती

..२/-

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (६) अन्वये निशुल्क देण्यात याव्यात. तरी सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ११.१२.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai

प्रदीप व्यास
26-11-2025

**मुंबई**
**दिनांक : २६.११.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ